Estd 1962
NAAC 'A' Grade
MHRD-NIRF -28th Rank

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

**विषय– विद्यापीठाचे ओळखपत्र, ॲप्रन/गणवेश, टोपी वापरणेबाबत.**

जा. क्र. आस्थापना/1609, दिनांक 17–05–2013 व जा.क्र. आस्थापना/2024 दिनांक 18–06–2013 व जा.क्र.आस्थापना/3101 दिनांक 20/09/2014 नुसार कार्यालयीन वेळेमध्ये ओळखपत्राचा वापर करणे बंधनकारक आहे. तरी जे शिक्षक व प्रशासकीय सेवक कार्यालयीन वेळेमध्ये ओळखपत्रे वापरत नसल्याचे कार्यालयाच्या निदर्शनास आलेस संबधीत शिक्षक व प्रशासकीय सेवकावर सेवानियमानुसार कारवाई करण्यात येईल. असे कळविण्यात आले होते. परंतु बरेच शिक्षक व प्रशासकीय सेवक कार्यालयीन वेळेमध्ये ओळखपत्राचा वापर करीत नसल्याचे कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे.

जा.क्र. आस्थापना /647 दिनांक 16–02–2013 व जा.क्र.आस्थापना/3101 दिनांक 20/09/2014 नुसार वर्ग–4 मधील सर्व सेवकांना कार्यालयांमार्फत देण्यात आलेले गणवेश (टोपीसह) कार्यालयीन कामकाजाचेवेळी परिधान करुन कार्यालयीन शिस्तीचे पालन करावे असे कळविण्यात आले होते. परंतु काही सेवक कार्यालयांमार्फत देण्यात आलेले गणवेश (टोपीसह) परिधान करीत नसल्याचे कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे.

तेव्हा अधिविभागप्रमुख व प्रशासकीय विभागप्रमुख यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, आपल्या विभागातील सर्व शिक्षक, प्रशासकीय सेवक व विद्यार्थी यांना कार्यालयीन वेळेमध्ये कार्यालयाने पुरविण्यात आलेले ओळखपत्र वापरण्याबाबत सूचना देण्यात येऊन याचे काटेकोर पालन होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी. त्याप्रमाणे ज्या सेवकांना विद्यापीठाने ॲप्रन /गणवेश (टोपीसह) पुरविले आहेत त्यांना ते वापरणेबाबत सुचना देण्यात याव्यात. तसेच या आदेशाची अंमलबजावणी सर्वांनी करण्याची असून जे सेवक उपरोक्त नियमाचे पालन करणार नाहीत त्यांचेवर संबधीत विभागप्रमुखांनी सेवानियमानुसार कारवाई करावी.

प्रभारी कुलसचिव

जा.क्र.आस्थापना/ 32-96

दिनांक : 01 SEP 2016

प्रति,

1. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक
2. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहाय्यक कुलसचिव, समकक्ष अधिकारी
3. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख
4. स्वीय सहाय्यक, मा.कुलगुरु, कुलसचिव, संचालक, बीसीयुडी, परीक्षा नियंत्रक, वित्त व लेखा अधिकारी यांना माहितीसाठी
5. इंटरनेट विभाग– सदरचे परिपत्रक INTRA NET वर प्रसिध्द करावे.

**टीप– सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक व प्रशासकीय सेवक यांच्या निदर्शनास आणावे.**

E:\SBS\Sachin Circular\Circular